RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

LATUR लातूर | वर्ष ३४ वे | अंक १३९ वा मंगळवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) | पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 | पृष्ठे – ६ | मो:९४२२४७२५०२ | किंमत १ रुपया

## अमेरिकेच्या टॅरिफ धमक्यादरम्यान चीनने भारतापुढे केला मैत्रीचा हात

### भारताच्या तीन मोठ्या समस्या सोडवण्याची घोषणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : एकीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धमक्या सुरु असताना दुसरीकडे चीनने भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला आहे. चीनने भारताच्या तीन प्रमुख चिंता दूर केल्या आहेत. चीनने भारताला खते, दुर्मिळ अर्थ मॅक्नेट्स/मिनरल्स तसेच टनेल बोरिंग मशीनच्या निर्यातीवरील निर्बंध उठवले आहेत.**



या प्रश्नी गेल्या जुलैमध्ये भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांची भेट घेतली होती. चीन दौऱ्यादरम्यान एस. जयशंकर यांनी भारताच्या तीन समस्यांबाबत चर्चा केली होती.

एएनआयने सुत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, वांग यी यांनी एस. जयशंकर यांना आश्वासन दिले की चीन भारताची खतांती गरज, दुर्मिळ अर्थ मॅग्नेट्स आणि टनेल बोरिंग मशीन या तीन प्रमुख अडचणी दूर करेल.

चीनचे परराष्ट्र मंत्री दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी सोमवारी भारतात दाखल झाले. त्यांनी भारत दौऱ्यादरम्यान, भारत आणि चीनच्या त्यांच्या राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने द्विपक्षीय संबंध कायम ठेवण्यावर सहमती दर्शवली. उभय नेत्यांच्या द्विपक्षीय चर्चेत बदलत असलेली जागतिक परिस्थिती, मुक्त व्यापारासमोरील आव्हाने आणि भारत आणि चीन ह्या प्रमुख शक्ती मिळून कसे काम करू शकतात?, विकसनशील देशांसाठी ते एक उदाहरण कसे ठरू शकतात? अशा विविध विषयांवर चर्चा झाली, असे वृत्त शिन्हुआ न्यूजने दिले आहे.

रब्बी हंगामात अचानक खतांच्या पुरवठ्यावर निर्बंध लागू केल्याने डाय-अमोनियम फॉस्फेटच्या उपलब्धतेवर थेट परिणाम झाला असल्याचे भारताने चीनच्या निदर्शनास आणून दिले होते. तसेच चीनने भारतातील प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी गरजेच्या असलेल्या टनेल बोरिंग मशीन्सची निर्यात रोखली होती. यात विदेशी कंपन्यांनी चीनमध्ये उत्पादन घेतलेल्या मशीन्सचा समावेश होता.

दुर्मिळ अर्थ मॅग्नेट्स आणि मिनरल्सवर चीनने लादलेल्या निर्बंधांमुळे ऑटो आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांकडून गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली होती. ज्यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. दोन्ही देशांमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्यादृष्टीकोनातून हे निर्णय घेण्यात आले होते.

पण आता चीनने भारताला खते, अर्थ मॅग्नेट्स आणि टनेल बोरिंग मशीनचा पुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे.

## अपहरणाच्या गुन्ह्यातील आरोपींना धाराशिव जिल्ह्यातून अटक

### बालकाची सुखरूप सुटका; पोलीस ठाणे कासारसिरसीची कारवाई!

**लातूर/प्रतिनिधी** : अपहरणाच्या गुन्ह्यातील आरोपींना धाराशिव जिल्ह्यातून अटक करण्यात आली असून बालकाची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. या बाबत समजलेली माहिती अशी की, फिर्यादीने पोलीस ठाणे कासारसिरसी येथे तक्रार दिली की, दिनांक १४/०८/२०२५ रोजी सकाळी त्यांचा अल्पवयीन मुलास निलंगा ते कासारसिरसी रोडवर करीबस्वेश्वर विदयालय समोरुन पळवुन घेऊन गेले. सदरील सुरेश, अजय, व एक अल्पवयीन मुलगा सर्व रा. कासारसिरसी ता. निलंगा यांनी अपहरण करुन कार मधून घेऊन गेल्याची माहिती देण्यात आली.



त्यावरून पोलीस ठाणे कासारसिरसी गुन्हा नोंदवुन संबंणित संशयिता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचे गांभीर्य पाहता पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा विशाल धुमे यांनी सदर गुन्ह्यातील अपहरण झालेल्या बालकाचा शोध घेऊन तिघांना अटक करण्याच्या सूचना देऊन मार्गदर्शन केले होते. त्यावरून पोलीस ठाणे कासार सिरसी चे सहा.पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड व पोलीस अमलदारांचे पथक तयार करुन आरोपीतांचा पुणे, सोलापुर, कल्याण जि. ठाणे येथे शोध घेतला असता ते वारंवार आपले ठिकाण बदलत असल्याने व अपहृत पिडीत बालक त्याचे सोबत असल्याने त्याच प्रमाणे आरोपीचा पूर्व इतीहास, वारंवार गुन्हे करण्याचे सवइने सराईत गुन्हेगार असल्याने लवकरात लवकर बालकाची सुखरूप सुटका करणे महत्वाचे होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी तपासाचे चक्रे फिरवुन शर्तीचे प्रयत्न करुन आरोपीतांचे सायबर पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांचे सहकार्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांच्या पथकाने शिताफीने उमरगा जि. धाराशिव येथुन दिनांक १७/०८/२०२५ रोजी सकाळी सुरेश यास ताब्यात घेवुन पिडीत बालकाची त्याचे ताब्यातुन सुटका केली. तसेच त्याच्या सोबत असलेले इतर दोन साथीदार हे घटनास्थळावरून पळून गेले होते त्यांनाहीकासारसिरसी येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

अधिक तपास केला असता यातील सुरेश याचे पत्नीला पिडीत बालकाच्या भावाने पळवुन नेल्याने सुडबुद्धीने, अविचारी व व्देषापोटी पिडीतास पळवून नेल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पोलीसांनी गुन्हयात वापरलेले वाहन जप्त केले असुन पुढील तपास सुरु आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकातील सहा. पोलीस निरीक्षक, प्रवीण राठोड, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर, पोलीस अमलदार तपसे, वरवटे, गायकवाड, नागमोडे, मस्के, डावरगावे, चव्हाण, शैलेश सुडे यांनी केली आहे

## बोरगाव व धडकनाळ गावातील वीजयंत्रणेला अतिवृष्टीचा फटका

**वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी भरपावसात महावितरणचे शर्थीचे प्रयत्न; जनमित्र, अधिकारी ऑन दी स्पॉट**



**उदगीर/प्रतिनिधी** : तालूक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे बोरगाव व धडकनाळ या दोन गावातील वीजयंत्रणेला मोठा फटका बसला आहे. वीजतारा, पोलसह रोहित्रे कोसळून दोन्ही गावांचा वीजपुरवठा काल रात्रीपासून खंडीत झाला आहे. महावितरणच्या विभागीय कार्यालयाने याची त्वरीत दखल घेत भरपावसात वीजयंत्रणा पुर्ववत सुरू करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

रविवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे बोरगाव व धडकनाळ गावपरिसरात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. आलेल्या पुरसदृश्य परिस्थितीमुळे बोरगाव व धडकनाळ गावांना वीजपुरवठा करणारे सात रोहित्रे, उच्चदाबाचे ४० पोल तर लघूदाब वीजवाहिनीचे ७० ते ८० पोल कोसळून जमीनदोस्त झाले आहेत. परिणामी या दोन्ही गावातील ३०० वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत झाला आहे.

लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले तसेच लातूर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनी तातडीने वीजयंत्रणा उभी करून व शक्य असेल तिथे पर्यायी यंत्रणा वापरून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश उदगीर विभागाचे व ग्रामीण विभागाचे अधिकारी यांना दिले. कार्यकारी अभियंता रविंद्र महाव्दार व ग्रामीणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री बाहेती यांनी तात्काळ जनमित्र व देखभाल दुरूस्तीकरणाऱ्या एजन्सीना पाचारण करून वीजयंत्रणा उभी करण्याचे काम संरू केलेले आहे. सतत पाऊस सुरू असलातरी भरपावसात महावितरणची यंत्रणा कामाला लागली असून किमान गावातील वीजपुरवठा तत्काळ सुरू करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

## अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडच्यावतीने माजी मंत्री आ. संभाजीभैय्या पाटील निलंगेकर यांना निवेदन

**निलंगा/आयुब बागवान:** अखिल भारतीय संतुजी ब्रिगेड हिंदु खाटीक युवा संघटनच्या वतीने राज्याचे माजी मंत्री तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री संभाजी भैय्या पाटील निलंगेकर हे हिंदु खाटीक, निलंगा आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा २०२५ साठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते यावेळी महात्मा जोतिबा फुले यांचे शिष्य, सहकारी, सत्यशोधक समाजाचे अग्रदूत डॉ संतुजी रामजी लाड यांची जयंती शासन स्तरावर साजरी करण्याच्या प्रमुख



मागणी सह समाजाच्या विकासासाठी विविध मागण्या सोडवणुकीसाठी निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली आहे यावेळी संस्थापक अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे , डॉ प्रमोद हातांगळे, श्री डोंगरे गुरुजी, श्री प्रल्हाद जी बाहेती, श्री सतिश जी बेंद्रे, अखिल भारतीय संतुजी संतुजी ब्रिगेड निलंगा तालुकाध्यक्ष श्री राहुल हातांगळे, श्री माधव जी टोपे, श्री सुशांत जी साबणे,श्री निळकंठ जी गंगणे आदी उपस्थित होते

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यात अतिवृष्टीमुळे एक लाख हेक्टर शेतीचे नुकसान...

### चिमटा दयाचा



पावसाने केला कहर ! शेती व जमीनीचे झाले नुकसान !! नुकसान भरपाई, मदतीसाठी होत आहे आवाहन !!!

## माहेश्वरी परिवाराच्यावतीने आयोजित जन्माष्टमी झुला सजावट स्पर्धेचे विजेतेपद 'द्वारकानगरी' ग्रुपने पटकावले

### श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या औचित्य साधून आयोजिण्यात आलेल्या उपक्रमास प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्हा माहेश्वरी सभा, लातूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटन, युवा माहेश्वरी व किशोरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या बालाजी मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या जन्माष्टमी झुला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक द्वारकानगरी की बहुरानियाँ ग्रुप ने पटकावले. या स्पर्धेत एकूण आठ ग्रुप्सने आपला सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत हरीप्रिया ग्रुप, सोनी ग्रुप, लाहोटीज एम्पायर ग्रुप, द्वारकानगरी की बहुरानिया ग्रुप,गोपिया ग्रुप, कान्हा की प्यारी गोपिया ग्रुप, मुरली ग्रुप, धर्मरक्षक ग्रुप अशा एकूण आठ ग्रुपने सक्रिय सहभाग घेतला. या आठ ग्रुपमधून ७० हुन अधिक सदस्या सहभागी झाल्या होत्या. सहभागी सदस्यांनी आपल्या कलाकृतींमधून श्रीकृष्णभक्तीचे अप्रतिम दर्शन घडवले. प्रत्येक गटाने झुला सजावटीत सुंदर कल्पकता व मनापासून मेहनत घेतली. सर्व गटांचा उत्साह, श्रम आणि भक्तिभाव खरोखरच अनुकरणीय ठरला. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक प्रथम - द्वारकानगरी की बहुरानिया ग्रुपने पटकावले. द्वितीय पारितोषिक कान्हा की प्यारी गोपिया ग्रुपने तर तृतीय पारितोषिक गोपिया ग्रुपने पटकावले.



पारितोषिक वितरण सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अनिल राठी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सीए प्रकाश कासट, फुलचंद काबरा, जगदीश भूतडा, राम भूतडा, अभिषेक मुंदडा, गिरीश सोनी, आलोक बाहेती, निकुंज भूतडा, योगेश मालपाणी, प्रांजल डागा, संस्कृती लोया,आनंद राठी (चैतन्य मंगल कार्यालय), तसेच प्रोजेक्ट चेअरमन सच्चय राठी, साईराज रांदड व सेजल सोनी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या झुला सजावट सोहळ्यात सहभागी झालेल्या गटांनी एकापेक्षा एक सरस देखावे प्रस्तुत करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या कार्यक्रमास समाजातील नागरिकांनीही भरपूर प्रतिसाद दिला. या सोहळ्यास मिळालेला प्रतिसाद पाहून संयोजनाचाही उत्साह दुणावला असून त्यांनी पुढील काळातही अशाच प्रकारचे कार्यक्रम समाजात घेण्यात येतील, असा विश्वास व्यक्त केला.

स्पर्धेत सहभाग नोंदविलेल्या सर्व गटांच्या अथक प्रयत्नांमुळे, मान्यवरांच्या सहकार्यामुळे आणि सहभागींच्या उत्साही प्रतिसादामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. माहेश्वरी समाजाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र हा सोहळा समाजातील ऐक्य, सर्जनशीलता व उत्सवप्रियतेचे हे सुंदर उदाहरण ठरले.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी ८.३ मिलीमीटर पावसाची नोंद



**लातूर/प्रतिनिधी** : जिल्ह्यात १९ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ८.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये रेणापूर तालुक्यात सर्वाधिक १३.१ मिलीमीटर, तर लातूर तालुक्यात सर्वात कमी ४.२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे - लातूर- ४.२, औसा- ६.५, अहमदपूर- ७.२, निलंगा- ९.९, उदगीर- ९.६, चाकूर- ७.८, रेणापूर- १३.१, देवणी- ११.७, शिरूर अनंतपाळ- ८.७ आणि जळकोट- ६.९ मिलीमीटर.

